दिनांक - २४ / ०७ /२०१७

## प्रेसनोट

### पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर

**आदेश क्र. पोउआ/वाहतुक/ ५९ /२०१७**

पुणे दिनांक - २४ / ०७ /२०१७

आदेश,

ज्याअर्थी पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी पार्कीगबाबत असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील.

**स्वारगेट वाहतुक विभाग पुणे अंतर्गत येणाऱ्या,**

**शंकरशेठ रोड ते मोलेदीना हायस्कुल रस्त्यावर गेट नं. २ पर्यंत रोडचे दोन्ही बाजूस १०० मीटर नो - पार्किंग करण्यात येत आहे.**

जा.क्र./पोउआ/वाह/ 5619 /२०१७

**प्रेसनोट**

पुणे, दिनांक - २५ / ०७ /२०१७

ज्याअर्थी पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी काही पार्किंग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - 25 /०७/२०१७ ते दिनांक - 08 /08/२०१७ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**सांगवी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**सारस्वत बॅक ते गणपती चौक यादरम्यान रोडवर पी १, पी २ करणेत येत आहे.**